Tie up

महाराष्ट्र शासन
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांचे कार्यालय.

परिपत्रक

क्रमांक:-एफएलआर ११९७/४०८३७/५-ब

मुंबई, २८ ऑक्टोबर १९९७

राज्यातील काही विदेशी मद्य उत्पादक स्वत:च्या तसेच अन्य मद्य उत्पादकांच्या ब्रॅन्डचे उत्पादन करतात. तसेच काही मद्य उत्पादक परदेशातील मद्य उत्पादकांच्या ब्रॅन्डचे उत्पादन करतात. पीएलएल अनुज्ञप्तीधारक अन्य घटकाच्या विदेशी मद्याचे उत्पादन करीत असल्यास लेबल्सवर काय मजकूर असावा याबाबत यापूर्वी सूचना निर्गमित केलेल्या नाहीत. त्यामुळे उपरोक्त प्रकारातील लेबल्सवर वेगवेगळा मजकूर छपाई केल्याचे निदर्शनास आले आहे. लेबल्सवरील छपाईमध्ये एकवाक्यता रहावी म्हणून महाराष्ट्र डिस्टीलेशन ऑफ स्पिरीट ॲन्ड मॅन्युफॅक्चर ऑफ पोटेबल लिकर रूल्स १९६६ च्या नियम २४ तसेच महाराष्ट्र मॅन्युफॅक्चर ऑफ बिअर ॲन्ड वाईन रूल्स १९६६ मधील नियम १९ मधील अधिकाराचा वापर करून विदेशी मद्याच्या लेबल्सवर खालीलप्रमाणे मजकूर छापण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत. Pg. 13

१. जे पीएलएल किंवा बीआरएल अनुज्ञप्तीधारक परदेशातील ब्रॅन्डचे उत्पादन करीत असतील त्या ब्रॅन्डच्या लेबलवर "ब्लेंडेड ॲन्ड बॉटल्ड बाय" किंवा "ब्रूड ॲन्ड बॉटल्ड बाय" असे छापून त्याखाली पीएलएल/बीआरएल अनुज्ञप्तीधारकाचे नांव छापण्यात यावे.

२. जे पीएलएल अनुज्ञप्तीधारक स्वत:च्या ब्रॅन्डचे उत्पादन करीत असतील त्या ब्रॅन्डच्या लेबलवर "मॅन्युफॅक्चरर्ड बाय" असे छापण्यात यावे.

३. जे पीएलएल अनुज्ञप्तीधारक अन्य घटकाशी करार करून त्यांच्या ब्रॅन्डचे उत्पादन करतील त्या ब्रॅन्डच्या लेबलवर "मॅन्युफॅक्चरर्ड बाय" असे छापून त्या व्यतिरिक्त "रजिस्टर्ड ट्रेडमार्क ऑफ" किंवा "अंडर टेक्निकल नो हाऊ फ्रॉम" असे छापून त्याखाली ज्या घटकाच्या मालकीच्या ब्रॅन्डचे उत्पादन करतात त्या घटकाचे नांव लिहावे लागेल.

२. वरीलप्रमाणे छपाई केलेल्या लेबल्सचा वापर दिनांक १.१.९८ पासून अंमलात येईल. ज्या पीएलएल अनुज्ञप्तीधारकांनी परदेशातील मद्य उत्पादकांशी करार केले असतील त्या करारपत्रांच्या प्रती या कार्यालयास सादर करून वर नमूद केल्या-खेरीज लेबलांवर अन्य मजकूर छापावयाचा असल्यास त्यासाठी या कार्यालयाची खास परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच उत्पादन शुल्क भरण्याबाबत प्रश्न उद्भवल्यास उत्पादन शुल्क भरण्याची जबाबदारी मद्य उत्पादन करणा-या पीएलएल घटकांवर राहील. याबाबत पीएलएल घटकाने सोबत जोडलेल्या नमुन्यात प्रतिज्ञापत्र (Affidavit)

..२..